**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

(फोन नं.०२४२३ - २५८५००/२५९६२६ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – saibabacollege1@sgmail.com )

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे वरीष्ठ महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळेकरिता आवश्यक साहित्य, ग्लासवेअर, केमिकल खरेदीकामी नामांकित कंपन्या/अधिकृत वितरक व विक्रेते यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – रु.३,६००/- (रु. तीन हजार सहाशे मात्र)
**बयाणा रक्कम** – रु.६०,०००/- (रु.साठ हजार मात्र)

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.०४/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१४/०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

४. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.१६/०२/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत / पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned by CamScanner

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, श्री साईबाबा महाविद्यालय - २५९६२६,

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.saibabacollege1@gmail.com

**मुंबई कार्यालय** - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


# श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयासाठी प्रयोगशाळा साहीत्य पुरविणेबाबत.. ई-निविदा

Scanned by CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदा फी रक्कम रु.३,६००/- (रु.तीन हजार सहाशे मात्र) व बयाणा रक्कम रु. ६०,०००/- (रू.साठ हजार) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

४. सदर निविदा दि.०४/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.१४/०२/२०१९ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. **ई-निविदेसोबत फक्त ऑनलाईन कागदपत्रे सादर करावयाची आहेत. हार्ड कॉपीमध्ये कागदपत्रे सादर करू नयेत. हार्ड कॉपीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. शक्य झाल्यास दि.१६/०२/२०१९ रोजी ई-निविदा Technical Bid उघडण्यात येईल.

७. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणेकामी दुरध्वनीवरून कळविण्यात येईल. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले दुरध्वनी/मोबाईल नंबर ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत, म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

८. कोणतीही निविदा अंशत:/ पुर्णपणे स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

**(श्रीमती रूबल अग्रवाल, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी



Scanned by CamScanner

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

## शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर

## निविदेच्या शर्ती व अटी

१. पुरवठा करावयाचे प्रयोगशाळा साहीत्य, ग्लासवेअर व केमिकलचा तपशिल सोबतचे परिशिष्टात (BOQ मध्ये) दिलेला आहे. त्यानुसार निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. ई-निविदा पुरवठा कालावधी - पुरवठा आदेश मिळालेपासून ०१ महिन्यांचा राहील.

३. निविदे सोबत दुकान नोंदणी दाखला, पॅन कार्ड, GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt, वगैरे सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

४. सर्व साहीत्यांचे, ग्लासवेअर व केमिकलचे दर भरतांना GST सह दर भरावेत. पुरवठा कालावधीत GST च्या दरात शासनाकडून वाढ किंवा घट झाल्यास त्यानुसार देयके आदा करण्यात येतील. तसेच साहीत्याचे दर भरतांना GST, वाराई, वाहन हॉल्टींग चार्जेस, पॅकींग व फॉरवर्डिंग खर्च, शासकीय कर, TDS व शिर्डी संस्थानचे महाविद्यालयात पोहोचचे वाहतुक खर्चासह सर्व समावेशक ऑनलाईन दर भरावेत.

५. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांची निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत प्रयोगशाळा साहीत्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर पुरवठा आदेशाचे एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १० दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा करावा लागेल अन्यथा आपण पुरविलेले साहीत्याच्या बिलातून सदरील रक्कम कपात करणेत येईल. सुरक्षा अनामत रक्कम सुरळित पुरवठा केलेनंतर व करार कालावधी संपल्यानंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

६. **साहित्य, ग्लासवेअर व केमिकल्सचा पुरवठा करतांना निविदेमध्ये नमुद केलेल्या कंपनीचे, साईजचे व ब्रॅण्डचेच पुरविणे बंधनकारक राहील. मंजुर झालेल्या कंपनी, साईज व ब्रॅण्डचे सोडून इतर साहीत्य स्विकारले जाणार नाहीत.** अशा वेगळ्या साहीत्याचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

७. सर्व साहीत्याचा पुरवठा हा पुरवठा आदेश मिळालेपासून ३० दिवसांचे आंत करावा लागेल. अपादावत्मक परिस्थितीमध्ये सद्यपरिस्थितीचा विचार करुन, मुदतवाढ देणेबाबत परिस्थितीनुरुप निर्णय घेण्यात येईल.

८. आलेल्या साहीत्याचे संपूर्ण बिल तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल.

९. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरित शिर्डी येथे समक्ष येऊन, रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

१०. कोणतीही निविदा अंशत:/ पूर्णपणे स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

११. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१२. **निविदा कालावधीत अगर त्यानंतरही गरजेनूसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा मागणी संस्थानकडून झाल्यास त्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेले सर्व साहीत्य खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.**

....२....

Scanned by CamScanner

१३. संस्थानला पुरविलेल्या साहीत्याचे बील साधारण १५ ते २० दिवसांच्या आत आदा करण्याचा प्रयत्न राहील. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

**१४. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

१५. पुरवठा आदेशात नमुद केलेप्रमाणेच प्रयोगशाळा साहीत्य, ग्लासवेअर व केमिकल्सचा पुरवठा करावा. पुरवठा केलेले साहीत्य कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत पुरवठाधारकाची राहील.

**१६. सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

१७. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात साहीत्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या साहीत्याच्या ५० टक्के साहीत्य पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

**१८. पुरवठा केलेले साहीत्य, ग्लासवेअर अथवा केमिकल खराब आढळल्यास ते स्वखर्चाने बदलून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.**

१९. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक निविदा उघडल्यानंतर ९० दिवसांची राहील.

२०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२१. पुरवठा आदेशातील साहित्य मुदतीत पुरविले नाहीत तर पुरवठा न केलेल्या साहित्याच्या किंमतीच्या ०.५ % ते ५ % पर्यंत दंड करण्यात येईल व सदर दंडाची वसुली आपले बिलातून अगर सुरक्षा अनामत रकमेतून विलंबाचे कालावधीनुसार खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेले साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत

आ) पुरवठा न केलेले साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत

मात्र विलंबाने पुरवठा केलेला माल स्विकारण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

२२. साहित्याचा पुरवठा आदेश दिलेनंतर जास्तीत जास्त ३० दिवसांचे आत साहीत्याचा पुरवठा न झाल्यास, अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने गरजेप्रमाणे किंवा दिलेल्या आदेशाइतके साहित्य बाजारातून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या साहीत्यसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.



Scanned by CamScanner

२३. निविदेतील मंजुर दराने साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने साहीत्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन साहीत्य खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

२४. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

(श्रीमती.रूबल अग्रवाल,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी



Scanned by CamScanner

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------

२. ------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------

दिनांक :- / /२०१९

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



Scanned by CamScanner

## अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/
तत्सम शासकीय परवाना
(उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) ☐

२. GST नंबर/ ऑनलाईन GST Registration Receipt ☐

३. पॅन कार्ड ☐

दिनांक - / /२०१९
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**



Scanned by CamScanner

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा महाविद्यालयाकरिता प्रयोगशाळा साहीत्य, ग्लासवेअर व केमिकल पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या साहीत्याचा, आपल्या मागणीप्रमाणे ३० दिवसांचे आंत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे श्रीर साईबाबा महाविद्यालयात पोहोच करण्याची हमी देतो. सदर साहीत्याचे नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

प्रयोगशाळा साहित्याची निविदा मंजुर झालेले मान्य दराने पुरवठा करण्याची हमी म्हणून, एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. अशी रक्कम मी भरणा न केल्यास, बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत प्रयोगशाळा साहित्य वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक -    /    /२०१९
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



Scanned by CamScanner

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

(फोन नं.०२४२३ - २५८५००/२५९६२६ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – saibabacollege1@sgmail.com )

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे वरीष्ठ महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळेकरिता आवश्यक साहित्य, ग्लासवेअर, केमिकल खरेदीकामी नामांकित कंपन्या/अधिकृत वितरक व विक्रेते यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – रु.३,६००/- (रु. तीन हजार सहाशे मात्र)

**बयाणा रक्कम** – रु.६०,०००/- (रु.साठ हजार मात्र)

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.०४/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१४/०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

४. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.१६/०२/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत / पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

Scanned by CamScanner